www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१९ – अंक २ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



नवीन आर्थिक वर्ष २०१९-२० ला सुरुवात झाली आहे. नवीन वर्ष येताना ते नवीन आशा / आकांक्षा, नवी आव्हाने आणि नवी ऊर्मी घेऊन येते.

गतवर्षाअखेर बँकिंग क्षेत्रामध्ये मोठी स्पर्धा असूनही आपल्या बँकेची कामगिरी चांगली झालेली असून व्यवसायामध्ये चांगली वाढ दिसून येते.

गतवर्षी झालेल्या प्रगतीचा आढावा घेऊन आणखी जोमाने बँकेस प्रगतिपथावर नेण्यासाठी नवीन वर्षासाठी बँकेची व्यवसायासाठी उद्दिष्टे निश्चित झाली असून वर्षाचे सुरवातीपासूनच या उद्दिष्टपूर्ततेसाठी सविस्तर कार्यक्रमाची आखणी शाखास्तरावर करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग असून ग्राहकांचे सहकार्यसुद्धा आवश्यक आहे.

गुणवत्तापूर्ण कर्जाचा विस्तार आपली प्राथमिकता आहे. केंद्रीय कर्ज प्रक्रिया (CPC) पद्धतीमुळे आता अचूक आणि झटपट निर्णय होतो. याचा लाभ ग्राहकांना व्हावा. शाखास्तरावर छोट्या कर्जांच्या विस्तारावर भर दिला जावा. थोडी सावधगिरी बाळगली, तर या कर्जप्रकारात धोका होत नाही. रिझर्व्ह बँकेच्या पाहणीनुसार छोट्या कर्जप्रकरणात अनियमिततेचे (NPA) प्रमाण अत्यल्प आहे. शाळेत कार्यरत शिक्षक, महाविद्यालयातील अध्यापक – प्राध्यापक, सरकारी-निमसरकारी कर्मचारी, कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचारी – अधिकारी वर्ग, छोटे दुकानदार, व्यावसायिक यांचेसाठी त्यांच्या गरजांचा अभ्यास करून उपयुक्त अनेक कर्ज योजना आपल्या बँकेने ग्राहकांना सादर केल्या आहेत. छोट्या खातेदारांची मोठी बँक म्हणून आपला नावलौकिक आहे. गेली काही वर्षे देशात शहरी मध्यम वर्ग झपाट्याने वाढतो आहे. छोटी कर्जे या घटकाची गरज आहे. या वर्गाचे उत्पन्न मर्यादित असले, तरीही त्यांची स्वप्ने मोठी असतात. या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी त्याला नेहमीच आर्थिक मदतीची गरज असते. सततच्या गरजेमुळे असे ग्राहक आपले कर्ज थकणार नाही, याची विशेष काळजी घेतात आणि बँकेशी कायमचे जोडले जातात.

ठेवींच्या विस्तारात आपला भर 'कासा' ठेवींच्या वाढीवर आहे. गेली दोन-तीन वर्षे ठेवींच्या मिश्रणात कासा ठेवीचे प्रमाण चांगले वाढले आहे. कासा ठेवीवरील व्याजाचा दर कमी असल्यामुळे बँकेचा व्याजाचा खर्च कमी होतो आणि निव्वळ नफा वाढतो. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार कासा ठेवीत झालेली वाढ ही बँकेच्या सक्षम ग्राहकसेवेचे प्रमाणपत्र आहे. त्यात सातत्य राखणे ही आपली जबाबदारी आहे.

बँकेच्या व्यवसाय वृद्धीमध्ये आपल्या माहिती तंत्रज्ञानाचा देखील मोठा सहभाग आहे. तंत्रज्ञानातील प्रत्येक उपयुक्त नवीन संशोधनाचा स्वीकार करीत व्यवस्था अद्ययावत राखण्यावर बँकेने नेहमीच भर दिलेला आहे. इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, यूपीआय, जेटपेसारख्या आणि इतर अद्ययावत ई-बँकिंग सुविधा आपण आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा वापर करणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

आपणा सर्वांच्या सक्रिय सहभागातून बँक याहीवर्षी प्रगतीच्या शिखरावर विराजमान होईल, याचा मला विश्वास आहे.

आपणा सर्वांना नवीन आर्थिक वर्षाच्या शुभेच्छा!

## पुणे मनपा स्थायी समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील कांबळे यांची बँकेस सदिच्छा भेट



श्री. सुनील कांबळे यांनी पुणे मनपा स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर बँकेस सदिच्छा भेट दिली. त्या वेळेस मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

## विलेपार्ले शाखेतील सेवकांच्या पाल्यांचा बँकेच्या अध्यक्षांच्या हस्ते सत्कार



मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांनी १२ मार्च २०१९ रोजी विले पार्ले शाखेस भेट दिली. या प्रसंगी, शैक्षणिक क्षेत्रात यश संपादित केलेल्या सेवकांच्या या पाल्यांचा, मा. संचालक श्री. मोहन फडके तसेच मा. स्थानिक सल्लागर समिती सदस्यांचे उपस्थितीत, मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. कु. धनश्री रविंद्र लिमये – चार्टर्ड अकाउंटंट व एम कॉम., कु. गौतमी मनोज कुलकर्णी – बी.आर्च, कु. गायत्री मनोज कुलकर्णी – बी.सी.ए., एम.सी.ए.

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## खातेदार चौगुले यांचा जयसिंगपूर शाखेतर्फे सत्कार



जयसिंगपूर शाखेतील सन्माननीय खातेदार, श्री लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था दत्तवाडचे संस्थापक चेअरमन तसेच श्री गुरुदत्त शुगर्स कारखान्याचे संस्थापक संचालक श्री. बबन आदिशा चौगुले यांची दक्षिण भारत जैन संस्थेच्या कोल्हापूर विभाग संचालकपदी निवड झाल्याबद्दल जयसिंगपूर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. संजय गोविंद देशपांडे यांनी जनता सहकारी बँकेतर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था दत्तवाड ही जयसिंगपूर शाखेपासून ३५ किमी अंतरावर आहे. पतसंस्था नेट बँकिंग सुविधा चांगल्या प्रकारे वापरत आहे. तसेच श्री. चौगुले हे परिसरातील पतसंस्थांनासुद्धा जनता बँकेत व्यवहार करणेबाबत आग्रही आहेत.

## सई पेटकर : अनोख्या नृत्य कार्यक्रमाच्या विश्वविक्रमाची नोंद चार पुस्तकांमध्ये



सांगली शाखेतील खातेदार श्री. शैलेश पेटकर यांची कन्या कु. सई शैलेश पेटकर, वय वर्ष ९ हिने दि. २४/०२/२०१९ रोजी कल्पद्रुम क्रीडांगण सांगली येथे सलग एक तास न थांबता स्केट्स घालून ११ लावण्यांवर नृत्य सादर केले.

भारत वर्ल्ड रेकॉर्ड, जिनियस बुक ऑफ रेकॉर्ड, गोल्डन स्टार वर्ल्ड रेकॉर्ड, वंडर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, अशा चार पुस्तकांमध्ये तिच्या या विश्वविक्रमाची नोंद केली गेली.

सई पेटकर हिने केलेल्या या विश्वविक्रमामुळे विविध क्षेत्रांतून तिचे कौतुक होत आहे.

आपल्या बँक परिवारातर्फे कु. सईचे अभिनंदन व तिला अनेक शुभेच्छा!

## मिताली देसाई बँकेतील पहिल्या महिला शाखा व्यवस्थापक



बँकेतील कनिष्ठ अधिकारी मिताली महेंद्र देसाई यांची नुकतीच मुलुंड शाखेच्या शाखा व्यवस्थापकपदी नियुक्ती झाली आहे.

शाखा व्यवस्थापक पदावर नियुक्ती झालेल्या मिताली देसाई या बँकेतील पहिल्या महिला अधिकारी आहेत.

## खातेदार कश्मीरा मुंगळे सीए परीक्षेत उत्तीर्ण



आपल्या देवरुख शाखेतील खातेदार कु. कश्मीरा संजय मुंगळे या चार्टर्ड अकौंटंट परीक्षा पहिल्याच प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झाल्या आहेत.

त्यांचे बँक परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

## सेवक प्रसाद पोटभरे यांची महाराष्ट्र राज्य वेतन मंडळावर नियुक्ती



बँकेतील सेवक आणि जनता बँक स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष श्री. प्रसाद अरविंद पोटभरे यांची महाराष्ट्र राज्य वेतन मंडळावर कामगार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली आहे.

श्री. प्रसाद पोटभरे यांचे सर्व सेवकांच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

## खातेदार तारळे यांची गडहिंग्लज अर्बन को-ऑप. बँकेच्या चेअरमन पदावर निवड



गडहिंग्लज शाखेचे माननीय खातेदार श्री. राजेंद्र शिवलिंग तारळे हे दी गडहिंग्लज अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., गडहिंग्लज बँकेच्या संचालकपदी होते.

या वर्षी त्यांची या बँकेच्या चेअरमनपदी निवड झालेली आहे.

## नऱ्हे–आंबेगाव शाखेमध्ये कार मेळाव्याचे आयोजन



नऱ्हे–आंबेगाव शाखेमध्ये डिसेंबर २०१८ मध्ये कार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. चौगुले इंडस्ट्रीज यांनी नवीन कार डिस्प्ले केल्या होत्या. कार्यक्रमाचा शुभारंभ शाखेच्या संपर्क संचालिका मा. डॉ. सौ. मधुरा मुकेश कसबेकर यांचे शुभ हस्ते दीपप्रज्वलनाने व श्रीलक्ष्मीपूजनाने झाला.

या प्रसंगी शाखा व्यवस्थापक श्री. सुनील धुमाळ यांनी बँकेकडून देण्यात येणाऱ्या विविध सेवांची तसेच ठेवींवरील आकर्षक व्याजदर, धनसंचय ठेव योजना व कर्जाच्या विविध योजना, जनता स्टार्टअप, उद्योगिनी कर्ज योजना, रिक्षा, दुचाकी–चारचाकी कर्ज योजना, गृहकर्ज योजनांची माहिती उपस्थितांना दिली. तसेच उपस्थित खातेदार व हितचिंतकांनी आपल्या नातेवाईक, मित्रमंडळींची खाती शाखेमध्ये उघडण्याबाबत व सेवेची संधी देण्याबाबत आवाहन केले. तसेच सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. अनिरुद्ध पळशीकर यांनी विविध TECHNOBASE SERVICES बाबत माहिती दिली.

## नऱ्हे–आंबेगाव शाखेमध्ये होम सेव्हिंग्ज ठेव ग्राहक मेळावा

१४ डिसेंबर २०१८ रोजी नऱ्हे–आंबेगाव शाखेमध्ये होम सेव्हिंग्ज ठेव ग्राहक मेळावा आयोजित केला होता. शाखेकरिता एकूण तीन होम सेव्हिंग एजन्ट नेमलेले आहेत. मेळाव्यास होम सेव्हिंग एजन्ट श्री. महेश प्र. देशपांडे, श्री. कृष्णा प्र. नाईक व सौ. नीता प्र. बुलबुले उपस्थित होते. एकूण १३२ खातेदार या सुविधेचा लाभ घेत आहेत.

## देवरुख शाखेमध्ये प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचे वाटप

देवरुख शाखेचे खातेदार श्री. अरमान नाझीम खांचे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (pmjsby) व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने (pmsby) अंतर्गत बँकेमार्फत विमा उतरविला होता.

या दोन्ही योजनांचा त्यांचे वारस आई श्रीमती रशीदा नाझीम खांचे यांना लाभ झाला असून प्रत्येकी रु. २ लाख असे दोन्ही योजनेअंतर्गत एकूण रु. ४ लाख रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली आहे.

### भावपूर्ण श्रद्धांजली

श्री. विजय प्रभाकर सोबळकर यांचे दि. ३१/०३/१९ रोजी दुःखद निधन झाले. सोबळकर बँकेच्या पेण शाखेतील कनिष्ठ अधिकारी होते.

श्री. विजय प्रभाकर खळदकर यांचे दि. ११/०४/१९ रोजी दुःखद निधन झाले. खळदकर बँकेच्या कर्वेरोड शाखेतील कनिष्ठ अधिकारी होते.

## औरंगाबाद, सिडकोमध्ये पहिल्या ग्राहक सेवा केंद्राचा शुभारंभ

औरंगाबादमध्ये जनता बँकेची पहिली शाखा १९६५ साली सुरू झाली, तसेच शहरातील व्यापारी उद्योजकांची गरज लक्षात घेऊन ५ वर्षांपूर्वी जालना रोड, औरंगाबाद येथे दुसरी शाखा सुरू झाली. जनता सहकारी बँकेच्या या शाखेमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत सर्व प्रकाच्या ग्राहकाभिमुख सेवा आपल्या ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. शहरातील असंख्य व्यापारी, उद्योजक, नोकरदार वर्ग या सुविधांचा लाभ घेताना दिसतो आहे. असे असले तरी जिल्ह्यातील १५० च्या वर शाळा व ज्युनिअर कॉलेजचे पगार औरंगाबाद शाखेत होतात. शहरातील सिडको, हडको, चिकलठाणा, TV Center चे शाखेपासूनचे अंतर ५ किमी आहे. औरंगाबाद शाखेमध्ये या भागातील येणारा ग्राहकवर्ग खूप मोठा आहे. या ग्राहकवर्गाला बँकिंग सुविधा घेण्यासाठी एवढे अंतर कापून यावे लागत आहे, त्यामुळेच या परिसरात नवीन शाखा सुरू करावी, अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे. यावर पर्याय म्हणून या परिसरातील शिक्षक, ग्राहकांना सुविधा मिळावी म्हणून सिडको भागातील ज्या वर्गापर्यंत बँकिंग सुविधा पोहोचल्या नाहीत, अशा वर्गास ग्राहक सुविधा देण्यासाठी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, ग्राहक सेवा केंद्राची (BC सेंटर) संकल्पना पुढे आली व सौ. अश्विनी हिवर्डे यांनी यावर काम करण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे सौ. अश्विनी उल्हास हिवर्डे यांना जनता सहकारी बँकेचे अधिकृत ग्राहक सेवा केंद्र, एन–९, एम–२ निमाई हॉस्पिटलजवळ सिडको औरंगाबाद येथे सुरू करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

दि. १८ जानेवारी २०१९ रोजी या सुविधेच्या शुभारंभाचा कार्यक्रम पार पडला. या ग्राहक सेवा केंद्राचे उद्घाटक मा.श्री. नितीन चित्ते – नगरसेवक मनपा औरंगाबाद यांचे हस्ते झाले, तर प्रमुख उपस्थिती मा. श्री. कैलास गायकवाड – नगरसेवक मनपा औरंगाबाद, मा. श्री. किरण पाटील – अध्यक्ष श्री तिरुपती शिक्षण संस्था, मा. श्री. बद्रिनाथ ठोंबरे – अध्यक्ष हडको–सिडको व्यापारी महासंघ, सचिव फार्मासिस्ट फोरम, मा. श्री. नंदकुमार गाडेकर – प्राचार्य बळीराम पाटील विद्यालय यांच्यासह परिसरातील १०० पेक्षा अधिक नागरिक उपस्थित होते.

## विश्व विभाग, पुणे महानगरद्वारा इच्छापत्राविषयी विशेष चर्चासत्र

दि. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व विभाग पुणे महानगर यांच्यामार्फत गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे यांच्या असेंब्ली सभागृहात इच्छापत्र या विषयासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. ज्यांची पाल्ये विदेशांत स्थायिक आहेत, अशा पालकांसाठी अथवा ज्येष्ठ नागरिकांसाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इच्छापत्राची माहिती व्याख्यान न देता सदर विषयावर चर्चा केली तर विषय लवकर समजतो, या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन विश्व विभागाद्वारे करण्यात आले होते.

या परिसंवादात ॲड. प्रमोद बेंद्रे, ॲड. सीमा बापट, ॲड. शीतल कुलकर्णी, ॲड. योगिनी टिळक, ॲड. सुजय जोशी व बँकेच्या एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाचे अधिकारी श्री. किशोर चव्हाण यांनी सहभाग घेतला होता. तसेच आपल्या बँकेचे मा. उपाध्यक्ष श्री. अभय माटे उपस्थित होते. कार्यक्रमास सुमारे २५० हून अधिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त बाजीराव रोड शाखेद्वारे खातेदार महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

दिनांक ०८/०३/२०१९ रोजी बाजीराव रोड येथील इमारतीच्या टेरेसवर जागतिक महिला दिनानिमित्त बाजीराव रोड शाखा, टिळक रोड शाखा व शनिवार-नारायण शाखेतील महिला खातेदारांकरिता नियोजन विभागाच्या मार्गदर्शनाखाली आपल्या बँकेने चिंचवड गाव शाखेतील खातेदार क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटर यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले.

आजच्या या धावपळीच्या युगात महिलांना स्वतःसाठीच वेळ देणे शक्य होत नाही, या बाबीचा विचार करून बँकेने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले.

या तपासणी शिबिरांतर्गत क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटरतर्फे महिलांच्या ब्लडप्रेशर, शुगर, थायरॉइड या तपासण्या मोफत करण्याचे ठरविले.

बँक महिलांच्या दृष्टीने अनेक योजनांचे तसेच कार्यक्रमांचे आयोजन करत असते. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. अभय माटे, संचालिका मा. सौ. मधुरा कसबेकर तसेच संचालिका सौ. गौरी कुंभोजकर व मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर इ. मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. या वेळी क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटरच्या सौ. सुनिता मुथा या महिलांना शुभेच्छा देण्यासाठी विशेषत्वाने उपस्थित राहिल्या. महिला दिनानिमित्त सौ. सुनिता मुथा यांचा बँकेतर्फे सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शाखेतील अधिकारी सौ. निलंगे यांनी केले. यानंतर अधिकारी सौ. भुजबळ यांनी मान्यवरांचा विस्तृत परिचय करून दिला. तसेच मान्यवरांचा सत्कार हा उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

सत्कारानंतर बँकेच्या महिला संचालिका मा. सौ. मधुरा कसबेकर, ज्या व्यवसायाने डॉक्टर आहेत, त्यांनी महिलांच्या आरोग्य तपासणीच्या निमित्ताने महिलांना अत्यंत उपयुक्त व छान मार्गदर्शन केले. यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. अभय माटे यांनी महिलांना गौरवपर शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृतीतील स्त्रीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या वेळी बँकेतील उच्च पदाधिकारी मा. श्री. भालचंद्र परांजपे, मा. श्री. दिलीप कुलकर्णी, मा. श्री. जगदीश कश्यप, मा. श्री. श्रीधर म्हसकर तसेच टिळक रोड शाखा व शनिवार-नारायण शाखा अधिकारी वर्ग व सेवक उपस्थित होते. कु. सिद्धी मोने यांनी आभार प्रदर्शन केले.

# बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी घेतले शास्त्रोक्त योगोपचाराचे धडे!

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत आहेत, पण हे करीत असताना त्यांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते, असे बहुतांश वेळा सिद्ध झाले आहे. हीच बाब लक्षात घेऊन जनता बँकेने महिलांसाठी 'शास्त्रोक्त योगोपचार : आधुनिक काळाची गरज' या विषयावरील दीड तासाची विशेष कार्यशाळा घेतली. स्वरूप



योग साधना केंद्राच्या प्रमुख प्रांजली फडणवीस यांनी या कार्यशाळेत महिलांना मार्गदर्शन केले. नुसते मार्गदर्शनच नाही, तर प्रात्यक्षिकाद्वारे शास्त्रोक्त योगाचे महत्त्वदेखील या वेळी पटवून देण्यात आले.

'वर्किंग वुमन'ने ऑफिसमध्ये कशा पद्धतीने काम केले पाहिजे, ठरावीक वेळेनंतर त्यांच्या हालचाली कशा हव्यात, कामाचा ताण असल्यास तो कशा प्रकारे हाताळावा, बसल्या-बसल्या पायांचे व मानेचे कोणते व्यायाम करावेत, या व अशा अनेक बाबींवर सौ. फडणवीस यांनी प्रकाश टाकला. त्यांच्या महिला शिष्यांनी पॉवर योगाचे १० प्रकार करून दाखवले. बँकेच्या पुणे व पिंपरी-चिंचवडच्या सर्व शाखांतील मिळून नव्वदहून अधिक महिलांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

# कोकण विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



जनता बँक स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे कोकण विभागाचे २ दिवसांचे अर्थात मुक्कामी स्नेहसंमेलन शनिवार दि. २६ व रविवार दि. २७ जानेवारी २०१९ रोजी रत्नागिरी शिरगाव येथे पार पडले. स्नेहसंमेलनानिमित्त कोकण विभागातील सेवकांच्या वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते. विभागातील १८ शाखा व २ विस्तारित कक्षांतील सर्व सेवकांना सहभाग घेता यावा म्हणून स्पर्धा २ शहरांत घेण्यात आल्या. दि. २२ व २३ डिसेंबर २०१८ रोजी रत्नागिरी व कोल्हापूर येथे बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ व कॅरमच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धेत सर्व शाखांतील १४० सेवकांनी (पुरुष/महिला) सहभाग घेतला व स्पर्धा आनंदी वातावरणात पार पडल्या.

स्नेहसंमेलनाची सुरुवात दि. २६/०१/२०१९ रोजी सायंकाळी प्रसन्न वातावरणात भारतमाता पूजनाने झाली. त्यानंतर 'भावगंध' या भावगीत व भक्तिगीतांच्या कार्यक्रमाने सर्व सेवक मंत्रमुग्ध झाले. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मा. संचालक श्री. विद्यानंदजी देवधर व मा. संचालक श्री. अमित शिंदे, असोसिएशनचे अध्यक्ष श्री. प्रसाद पोटभरे व कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष श्री. अभिजीत मकाशीर आणि रत्नागिरी शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. सुहास पाटणकर यांचे हस्ते दीप प्रज्वलन झाले. मान्यवरांचे हस्ते स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस समारंभ झाला. प्रास्ताविक कोकण विभाग प्रतिनिधी श्री. चंद्रकांत माने यांनी केले. मा. संचालक श्री. देवधर यांनी विविध स्पर्धांतील विजेत्यांचे विशेष कौतुक केले. आभार प्रदर्शन श्री. सुहास पाटणकर यांनी केले, तर कु. चैत्राली नाईक यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन श्री. विनायक जोशी व श्री. प्रसाद दांडेकर यांनी केले.

# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला’

## ओळख स्वत:ची

मित्रांनो, ही दोन उदाहरणे प्रातिनिधिक. आता तुम्ही सर्वांनी आपल्या क्षेत्रातील कार्यानुभव घरी गेल्यावर लिहून काढा. तोपर्यंत स्वत:ची ओळख करून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये लक्षात घेऊ.

स्वत:तील क्षमता आणि कल कसे ओळखायचे? :

‘‘आपल्या क्षमता आणि कल कोणकोणते असतात हे कळले पण जर कल चाचणी झाली नसेल तर आपण आपल्या क्षमता आणि कल कसे ओळखायचे?’’

नेहा.

‘‘नेहा तुझ्या शैक्षणिक प्रगतीचा आजपर्यंतचा आढावा सांगू शकशील का?’’

‘‘म्हणजे मी नक्की काय करायचे?’’

‘‘हे बघ, आज तू शिक्षणाच्या कोणत्या टप्प्यावर आहेस?’’

‘‘मी बी. कॉम. झाले आहे आणि सध्या एम.बी.ए. साठी तयारी करते आहे. तसे मला कधी कधी वकिली करावी असेही वाटते. कारण माझे वडील आणि आई दोघेही वकील आहेत. अर्थात मी मला हवे ते शिक्षण घ्यावे असे ते नेहमी म्हणतात. ते मला त्यांच्या व्यवसायात येण्याचा आग्रह करत नाहीत.’’

‘‘उत्तम. आता मला सांग, तुला १० वी १२ वी आणि बी. कॉम. या ३ महत्त्वाच्या टप्प्यांवर कसे गुण होते? कोणते विषय खूप सोपे जायचे किंवा फारसे सोपे जायचे नाहीत तसेच कोणते विषय आवडत नव्हते?’’

‘‘सर, १० वी पर्यंत मला बहुतेक सर्व विषयांत बरे म्हणजे ७०-७५ टक्के गुण पडत असत. मराठीमध्ये थोडे गुण कमी पडत, पण इंग्लिशमध्ये चांगले असत. इतिहास, भूगोल हे विषय फारसे आवडत नसत. पण शास्त्र आवडायचे, त्यात भौतिक आणि रसायन यापेक्षा जीवशास्त्र आवडायचे. गणित ठीक होते, पण




**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

अंकगणित चांगले होते.’’

माझ्या बरोबरची बरीच मुले सायन्सकडे गेली. मी मात्र गणिताची आणि भौतिकशास्त्राची आवड कमी असल्याने कॉमर्स करण्याचा निर्णय घेतला. १२ वीमध्ये अकौंटन्सी आणि इकॉनॉमिक्समध्ये चांगले मार्क होते. मी गणित सोडल्याने सी.ए.साठी प्रयत्न केले नाहीत. कारण सी.ए. होणे खूप अवघड आहे असे अनेकांनी सांगितले होते. बी.कॉम. ला. ७१ टक्के गुण मिळालेत. आता पुढे काय करावे असा मोठा प्रश्न माझ्या पुढे आहे.’’

‘‘शाळेमध्ये आणि महाविद्यालयात असताना कोणकोणत्या उपक्रमांत भाग घेतलास?’’

‘‘फारसा नाही, पण संमेलनात माझा सगळा ग्रुप काम करत असे. त्यांना मी जमेल तशी मदत करत असे. म्हणजे जे काही काम मला सांगितले असेल ते करायचे.’’

‘‘काही छंद किंवा खेळातील सहभाग?’’

‘‘नाही.’’

‘‘काही वाचन करतेस का?’’

‘‘वर्तमानपत्र वाचते. कधी एखादे मासिक वाचते. पण छंद म्हणावा असे वाचन नाही. मला मित्रमैत्रिणींशी गप्पा मारायला आवडते. सिनेमा पाहण्यास आवडते. फिरायला जाणे आवडते. रोज सकाळी तासभर मी फिरण्याचा व्यायाम करते. जुनी हिंदी आणि मराठी गाणी मला आवडतात. आमचे एकत्र कुटुंब आहे. त्यामुळे माणसांमध्ये रमते, एकटे असल्यास बोअर होते.’’

‘‘नेहा, तुझ्या सांगण्यावरून हा निष्कर्ष.’’

‘‘तुझी विचार करण्याची तसेच तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता चांगली आहे. तुझे अंकगणितीय कौशल्य चांगले आहे, पण बहुधा सरावाच्या अभावाने तुला गणिताची भीती वाटत असावी आणि गणिताच्या भाषेमध्ये भौतिकशास्त्र लिहिलेले असते म्हणून भौतिकशास्त्र पण आवडत नसेल.

‘‘आता चांगले आणि उत्तम किंवा अत्युत्तम यामध्ये बराच फरक आहे. तुझे गुण ७०-७५ या मर्यादेत राहिले. ते काही मुलांचे ९०-९५ पर्यंत असतात. तुझा बी.कॉम. करण्याचा निर्णय बहुधा मध्यम गुण पडल्याने असावा, हे बरोबर आहे का?’’

‘‘हो, माझ्या सायन्सकडे गेलेल्या सर्व मित्रमैत्रिणींचे गुण ८५-९० टक्क्यांच्या आसपास होते.’’ नेहा म्हणाली.

‘‘तुझे भाषिक कौशल्य चांगले आहे. तुला इंग्रजी भाषा पण चांगली येते. पण संभाषण कौशल्य कसे आहे हे तुझ्या सांगण्यावरून लक्षात येत नाही. तुला वाचनाची फारशी आवड नाही आणि तुला गप्पा मारायला आवडत असल्या तरी निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा अशी कोणतीही गोष्ट तू उल्लेखलेली नाही.’

‘‘तुला माणसे आवडतात, तू माणसांमध्ये रमतेस, संमेलनात ग्रुपमधील मित्रमैत्रिणींनी सांगितलेली कामे तू केलीस, तुला एकटेपणाचा कंटाळा येतो. हे सर्व तुझी सामाजिक क्षमता चांगली आहे असे सुचवते. कलात्मक क्षमता दर्शविणारे काही काम तू केलेले दिसत नाही. त्यामुळे त्याबद्दल काही सांगता येणार नाही.

‘‘नेहा, यापुढील शिक्षणाकरता तुला अनेक पर्याय उपलब्ध आहेत, पण तुला जे क्षेत्र आवडते, जिथे काम करायला तुला आनंद वाटेल, तेच क्षेत्र तू निवड.’’ माझा मुद्दा नेहा आणि इतर मुलांना पटला असावा.

‘‘सर, त्रिमितीय विचार करण्याची क्षमता आणि सृजनशीलता यांचा तुम्ही मागे उल्लेख केला होता. या क्षमता आमच्यामध्ये आहेत का नाहीत हे कसं ओळखायचं? एखादी चाचणी आहे का?’’ गणेश म्हणाला.

‘‘गणेश, मागच्या सत्रात त्रिमितीय विचार करण्याची क्षमता या विषयाबद्दल माहिती सांगत असताना मनोजने एक शंका उपस्थित केली होती आणि त्या वेळी त्या शंकेचे निराकरण नंतर एका कृतीतून करू असे म्हणालो होतो, हे बहुधा तुला आठवत असेल. आता ती कृती करायची वेळ आली आहे. मला खात्री आहे की या कृतीतून तुमच्या मनातील शंका निश्चितच दूर होईल.’’

‘‘मित्रांनो, आपण थोडी गंमत करू, सगळ्यांनी नक्कीच हत्ती पाहिला असणार तेव्हा प्रथम सगळ्यांनी आपापल्या वहीत हत्तीचे चित्र काढा. यासाठी तुम्हाला २-३ मिनिटांचा वेळ देतो.’’

सर्व जण चित्र काढू लागले, थोड्या वेळाने मी त्यांना त्यांची वही शेजारी बसलेल्या मुलाकडे देण्यास सांगितले आणि सूचना केली की सर्वांनी आपल्या हातातील वहीवर काढलेले हत्तीचे चित्र, हत्तीच्या आकारमानानुसार कितपत जुळणारे आहे ते तपासावे.

**क्रमश:**

# धोपावकर परिवार विश्वस्त निधीद्वारे आर्थिक देणगी प्रदान कार्यक्रम

धोपावकर परिवार विश्वस्त निधी या संस्थेचे व्यवस्थापन आपल्या बँकेकडे आहे. विविध सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी वितरणाचा कार्यक्रम दिनांक २ मार्च २०१९ रोजी संपन्न झाला. प्रास्ताविकानंतर विश्वस्त निधीचे संस्थापक विश्वस्त श्री. नागेश धोपावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध सामाजिक संस्थांना एकूण रक्कम रु.२.५० लाख इतकी आर्थिक देणगी अदा करण्यात आली. सदर देणगीचा स्वीकार पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, चिंचवडचे प्रमुख समन्वयक श्री. गिरीष प्रभुणे, कॅाक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲन्ड स्पीच पुणे या संस्थेचे डॉ. अविनाश वाचासुंदर, माई बालभवन देहूरोड पुणे यांच्या संस्थापिका प्रतिज्ञा इंगळे, उद्योगधाम तळेगाव दाभाडे, पुणे या संस्थेचे कार्यवाह व आपल्या बँकचे अधिकारी श्री. मंदार देशपांडे, गुहागर तालुका अपंग पुनर्वसन संस्था ता. गुहागर जिल्हा रत्नागिरी या संस्थेचे कार्यवाहक श्री. अनगुडे प्रकाश बाबू यांनी आर्थिक देणगीचा स्वीकार केला. तसेच आपल्या संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

# शारदा-विष्णू पारितोषिक व आर्थिक देणगी प्रदान कार्यक्रम

शारदा विष्णू चॅरिटेबल ट्रस्ट या सार्वजनिक निधीचे व्यवस्थापन बँकेकडे आहे. या वर्षी उपरोक्त संस्थेद्वारे विविध सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी अदा करण्याचा कार्यक्रम दि. २६.०२.२०१९ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमात कला क्षेत्रातील पारितोषिक आनंद मंडळ संचालित त्र्यंबकेश्वर मर्दानी आखाडा, पुणे यांना देण्यात आला. धनादेश व सन्मानचिन्ह देऊन संस्थेचे संस्थापक श्री. विनोद आढाव यांना गौरविण्यात आले. तसेच संगीत क्षेत्रात स्वर - ताल साधना, पुणे या संस्थेस शारदा-विष्णू पारितोषिक देण्यात आले. संस्थेचे संस्थापक श्री. संजय करंदीकर यांना धनादेश व सन्मानचिन्ह देण्यात आले. त्याचबरोबर विवेकानंद केंद्र पुणे, महाराष्ट्र मंडळ टिळक रोड, पुणे, वनवासी कल्याण आश्रम पुणे, ज्ञान प्रबोधिनी पुणे, स्वा.सावरकर स्मारक शिवाजी पार्क दादर, पुणे विद्यार्थी गृह पुणे, शेठ ताराचंद रामनाथ चॅरिटेबल आयुर्वेदिक हॉस्पिटल ट्रस्ट पुणे, या सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी प्रदान करण्यात आली. सदर संस्थांचे प्रमुख पदाधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते व प्रत्येकाने आपापल्या संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

# इंदापूर शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त स्नेहमेळाव्याचे आयोजन

इंदापूर शाखेच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्याचा शुभारंभ नगराध्यक्षा अंकिता शहा यांच्या हस्ते झाला. त्या वेळी नगरसेविका उषा श्रीकांत स्वामी, ॲड. श्रीनिवास देशपांडे, मेघश्याम पाटील, मुकुंद विंचू, मिलिंद दोशी, संजय गानबोटे, पोपट जगताप, युवराज गलांडे, पत्रकार संघाचे शहराध्यक्ष सुरेश जकाते उपस्थित होते. या वेळी नगर परिषदेस स्वच्छता अभियानात दोन राष्ट्रीय मानांकन मिळवून देऊन शहराचा देशात नावलौकिक वाढवल्याबद्दल नगराध्यक्षा शहा व नगरसेविका स्वामी तसेच बँक गुणवंत खातेदारांचा सत्कार झाला.

# बँकेच्या हडपसर, गोरेगाव आणि तळेगाव स्टेशन या शाखांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा संपन्न

हडपसर शाखेमध्ये दि. १९ जानेवारी २०१९ रोजी ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री. हरिभाऊ जगताप यांनी केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे भागप्रमुख व हडपसर शाखेचे ग्राहक सेवा समिती सदस्य श्री. काका डहाळे यांनी बँकेतर्फे उपस्थितांचा परिचय करून दिला. हडपसर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. सुरेश पराड यांनी बँक देत असलेल्या विविध सेवांची माहिती दिली.

गोरेगाव शाखेमध्ये दि. २ फेब्रुवारी २०१९ रोजी ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा संपन्न झाला. सदर कार्यक्रमास गोरेगाव शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. अंकुश बेटकर, सहाय्यक व्यवस्थापक श्री. शैलेश घोसाळकर व शाखेतील सेवक उपस्थित होते. तसेच स्थानिक सल्लागार सदस्य श्री. मोहन गीते व श्री. संजीव अग्निहोत्री यांची उपस्थिती होती.

तळेगाव स्टेशन शाखेमध्ये दि २२/०२/२०१९ रोजी ज्येष्ठ नागरिक मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी शाखेचे स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री. संजय हुंडेकरी, सीए श्री. स्वानंद आगाशे, दिलीपभाई शहा, राजूशेठ शहा उपस्थित होते. तसेच स्टाफ वेल्फेअर असोशिएशनचे जिल्हा प्रतिनिधी श्री. सुरेंद्र थिटे, मॉडर्न महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. जयंत जोर्वेकर, माजी आमदार तु. ना. माताडे, श्री. अरविंद वाडदेकर, श्री शेट्टर, विधान सल्लागार श्री. श्रीराम कुबेर, श्री. विश्वनाथ दाभाडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य श्री. उळावी, श्री. कुलकर्णी, कलापिनी संस्थेचे श्री. अशोक बकरे, उद्योगधाम संस्थचे श्री. सुहास नाखरे, सरस्वती शिक्षण संस्थेचे श्री. सुरेश झेंड, श्री. शिरोडकर, निवृत्त बँक अधिकारी सौ. जोर्वेकर, श्री. विनोदभाई मेहता व अनेक खातेदार, सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. ॲड. प्रमोद बेंद्रे यांनी आजच्या काळात इच्छापत्राची आवश्यकता व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे इत्यादींविषयी विस्तृतपणे माहिती दिली.

# माहे जानेवारी ते मार्च २०१९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|
| श्री. सुरेश शं. भातडे | कनिष्ठ अधिकारी | फोर्ट |
| श्री. महेश ब. किराड | कनिष्ठ अधिकारी | विधी वसुली |
| श्री. मदन श्री. यादव | कनिष्ठ अधिकारी | कर्वेनगर |
| श्री. दिलीप श्री. देशमुख | कनिष्ठ अधिकारी | लातूर |
| श्री. दिपक व. दिक्षीत | कनिष्ठ अधिकारी | ऑडिट इन्स्पे. |
| श्री. शरद भा. देसाई | कनिष्ठ अधिकारी | शि. नगर रत्ना. |
| श्री. रंगनाथ व्यं. बुरली | लेखनिक | कोल्हापूर |
| श्री. श्रीनिवास द. कारमपुरी | लेखनिक | कर्वेरोड |
| श्री. बिहारीलाल र. परदेशी | लेखनिक | जुन्नर |
| श्री. प्रकाश भा. सातपुते | लेखनिक | तळे. स्टेशन |
| श्री. आनंद दि. काळे | शिपाई | चिंचवड गाव |
| श्री. सुनिल ब. खरात | शिपाई | संगमेश्वर |

## अभिनंदन !!! बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी..

### Certificate Examination of Corporate Agents

| नाव | शाखा/विभाग | हुद्दा | परीक्षा वर्ष |
|---|---|---|---|
| सौ. चैत्राली विवेक प्रयाग | कर्वेरोड | कनिष्ठ अधिकारी | २५/०२/१९ |
| सौ. प्राची पिनाक काळे | कर्वेरोड | कनिष्ठ अधिकारी | ३/०३/१९ |
| कु. वृषाली अंबीदास काटे | टिळक रोड | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| श्री. श्रेयस सुनिल पेठे | विधी वसुली | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| श्री. हर्षद प्रमोद नंदुरे | मार्केटिंग | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| श्री. योगेश दिलीप मराठे | मार्केटिंग | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| श्री. संतोष विश्वनाथ बाम | मार्केटींग | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| श्री. रमेश राजाराम काळे | मार्केटिंग | कनिष्ठ अधिकारी | २८/०२/१९ |
| कु. सिद्धी शिवकुमार मोने | बाजीराव रोड | कनिष्ठ अधिकारी | २०/०३/१९ |
| श्री. राहुल मच्छिंद्र कदम | मार्केटिंग | लेखनिक | २८/०२/१९ |
| श्री. सागर मोतीलाल परदेशी | शिवाजीनगर पुणे | लेखनिक | २५/०२/१९ |
| कु. अपूर्वा राजीव काळे | सूस पाषाण रोड | लेखनिक | ५/०३/१९ |
| श्री. अतीत जयंत म्हसकर | सूस पाषाण रोड | लेखनिक | १२/०३/१९ |
| श्री. मिलिंद रघुनाथ हसुरे | गडहिंग्लज | लेखनिक | १२/०३/१९ |
| श्री. गौरव उदय रास्ते | भवानी पेठ | लेखनिक | १४/०३/१९ |
| श्री. सौरभ सुभाष आठल्ये | देवरूख | लेखनिक | १४/३/१९ |
| सौ. प्रीती महेश आमराळे | शनिवार नारायण पेठ | लेखनिक | २२/०३/१९ |
| श्री. प्रशांत भालचंद्र काशीकर | तळेगाव स्टेशन | कनिष्ठ अधिकारी | २२/०३/१९ |
| कु. गंधाली किशोर भडकमकर | सहकारनगर | लेखनिक | ०५/०३/१९ |
| सौ. प्रतिक्षा सागर ढगे | शिवाजीनगर पुणे | लेखनिक | १२/०३/१९ |
| श्री. ऋषीकेश श्रीधर काणे | गांधीनगर | लेखनिक | १४/०३/१९ |

### ICWA / CAM

| नाव | शाखा/विभाग | हुद्दा | परीक्षा वर्ष |
|---|---|---|---|
| श्री. संदीप मनोहर पवार | क्रेडिट प्रोसे सेल मु. क. | कनिष्ठ अधिकारी | डिसेंबर १८ |

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग अॅण्ड फायनान्स या संस्थेने अनुक्रमे Information System Banker, IT Security & Cyber Crimes and Fraud Management या तीनही विषयांत उत्तीर्ण झाल्याने खालील सेवकांना DISA हे प्रमाणपत्र दिलेले आहे.**

| अ.क्र. | नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. जगदीश पुरुषोत्तम कश्यप | सह. महाव्यवस्थापक | प्रशासन विभाग |
| २. | श्री. पंकज गुणाजी पांचाळ | वरिष्ठ अधिकारी | कोअर बँकिंग |

## शाखा वर्धापन दिनाच्या शुभेच्छा!
### (माहे एप्रिल ते जून)

| अ.क्र. | शाखा | दिनांक |
|---|---|---|
| १. | अंबाजोगाई | १ मे |
| २. | भोर | ६ मे |
| ३. | भवानी पेठ | ९ मे |
| ४. | घोडनदी | १३ मे |
| ५. | विलेपार्ले | १४ मे |
| ६. | गिरगाव | १४ मे |
| ७. | मार्केटयार्ड | २१ मे |
| ८. | रत्नागिरी | २३ मे |
| ९. | शि. नगर रत्नागिरी | २३ मे |
| १०. | साखरपा | २३ मे |
| ११. | देवरूख | २३ मे |
| १२. | माखजन | २३ मे |
| १३. | संगमेश्वर | २३ मे |
| १४. | पावस | २३ मे |
| १५. | गोरेगाव | २५ मे |
| १६. | अहमदनगर | २५ मे |
| १७. | कात्रज | २८ मे |
| १८. | फर्ग्युसन रोड | ३ जून |
| १९. | चिंचवड गाव | १० जून |
| २०. | पिंपरी | १४ जून |
| २१. | फोर्ट | २८ जून |

## आपटे स्मृती सार्वजनिक विश्वस्त निधीद्वारा म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक

कै. सौ. मीरा बाळकृष्ण आपटे स्मृती सार्वजनिक विश्वस्त निधी या विश्वस्त निधीचे व्यवस्थापन बँकेकडे आहे. दरवर्षीप्रमाणे गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

बँकेचे मा. संचालक श्री. लक्ष्मणराव पवार, सरदार कान्होजी आंग्रे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.प्रिया नाझरे व शिक्षक वर्ग उपस्थित होता. तसेच बँकेचे एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाचे कनिष्ठ अधिकारी श्री.किशोर चव्हाण व लेखनिक कु.अक्षता पुजारी उपस्थित होत्या.

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पारितोषिकाचे वितरण बँकेचे मा. संचालक श्री. लक्ष्मण पवार यांच्या हस्ते करण्यात आले. बँकेचे मा. संचालक श्री. लक्ष्मण पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.प्रिया नाझरे यांनी मनोगत व्यक्त केले.

# बँकेचे सेवक निभावत आहेत जनसंपर्क अधिकाऱ्यांची भूमिका

## खातेदारांकडून उपक्रमाचे विशेष कौतुक

बाजीराव रोड शाखेमध्ये जनसंपर्क अधिकारी (PRO) म्हणून दररोज एका सेवकाने काम पाहावयाचे, असा उपक्रम सुरू केला आहे. सेवक लॉबीमध्ये फिरून खातेदार / ग्राहक यांना आवश्यक ती मदत करीत असतात. विविध माहिती उदा. ठेवी, कर्ज, अन्य सर्व सेवा, याची माहिती दिली जाते. तसेच काही अडचण असल्यास त्वरित दूर केली जाते.

तसेच खातेदार, ग्राहक यांना त्यांची मते उत्स्फूर्तपणे मांडता यावीत, यासाठी शाखेमध्ये 'अभिप्राय' नावाचा फलक लावलेला आहे. खातेदार, ग्राहक यांना बँकेच्या सेवेबद्दल अथवा अन्य कोणत्याही गोष्टीबद्दल काही मत मांडावयाचे असल्यास अथवा सूचना करावयाची असल्यास फलकाशेजारी ठेवलेल्या कागदावर ती लिहून तो कागद फलकावर चिकटविणे, असा उपक्रम केलेला आहे. ग्राहकांनी त्यास उदंड प्रतिसाद दिला असून केवळ १५ दिवसांत १५० पेक्षा जास्त प्रतिक्रिया ग्राहकांनी दिल्या आहेत. त्यामध्ये बँकेची सेवा उत्तम असल्याचे नमूद केले आहे. आहे.

बँकेचे सर्व व्यवहार सुरळीत असून सर्व स्टाफ मन लावून काम करतात व माझीच नाही, तर इतर जणांचीसुद्धा मदत करतात.
– एम व्ही. देशपांडे

जनता सहकारी बँकेची सर्व्हिस व्यवस्थित आहे. वेळेवर आणि समजूतदारपणे कामे करणारे सर्व जण आहेत.
– नंदा पुष्कराज पाटील

बँकेची सेवा चांगली आहे आम्ही खूप जुने खातेदार आहोत. बँकेला खूप खूप शुभेच्छा!
– सौ. मंगला चिं. खळदकर

आपल्या शाखेतील सर्व कर्मचारी वर्गांची सेवा अतिशय तत्पर, चांगली आहे.
– गुजराथी

## अभिनंदन !!! बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी.....

| नाव | परीक्षेचा प्रकार | शाखा/विभाग | हुद्दा | वर्ष |
|---|---|---|---|---|
| श्री. जगदीश पुरुषोत्तम कश्यप | इन्फॉर्मेशन सिस्टीम बँकर | प्रशासन | सह महाव्यवस्थापक | मार्च २०१९ |
| श्री. किशोर दिवाकर देशपांडे | इन्फॉर्मेशन सिस्टीम बँकर | सेंट्रलाईज्ड सेल | चीफ ऑफिसर | जानेवारी २०१९ |
| श्री. जगदीश पुरुषोत्तम कश्यप | आय.टी.सिक्युरिटी | प्रशासन | सह महाव्यवस्थापक | जानेवारी २०१९ |
| सौ. सई चिन्मय सोवनी | आय.टी.सिक्युरिटी | स्थावर | प्रोबे. कनिष्ठ अधिकारी | जानेवारी २०१९ |
| श्री. किशोर दिवाकर देशपांडे | आय. टी. सिक्युरिटी | सेंट्रलाईज्ड सेल | चीफ ऑफिसर | जानेवारी २०१९ |
| श्री. किशोर दिवाकर देशपांडे | सायबर क्राइम्स ॲण्ड फ्रॉड मॅनेजमेंट | सेंट्रलाईज्ड सेल | चीफ ऑफिसर | ऑक्टोबर २०१९ |
| श्री. राहुलकुमार शिवकुमार पाण्डेय | ॲन्टी मनी लॉण्डरींग ॲण्ड नो युवर कस्टमर | मुलुंड | लेखनिक | मार्च २०१९ |
| श्री. उदय वसंतराव कुलकर्णी | कस्टमर सर्व्हिस ॲण्ड बँकिंग कोड्स ॲण्ड स्टॅण्डर्ड्स | गांधीनगर | वरिष्ठ अधिकारी | फेब्रुवारी २०१९ |
| श्री. राहुलकुमार शिवकुमार पाण्डेय | कस्टमर सर्व्हिस ॲण्ड बँकिंग कोड्स ॲण्ड स्टॅण्डर्ड्स | मुलुंड | लेखनिक | फेब्रुवारी २०१९ |
| श्री. अविनाश नारायण वावरे | एनआयएसएम | ओतूर | वरिष्ठ अधिकारी | डिसेंबर २०१८ |
| श्री. चंद्रशेखर मधुसूदन मुळये | एनआयएसएम | भवानी पेठ | कनिष्ठ अधिकारी | फेब्रुवारी २०१९ |
| श्री. प्रसाद शशिकांत हिंगमिरे | एनआयएसएम | गुंतवणूक | कनिष्ठ अधिकारी | ऑक्टोबर २०१८ |
| श्री. अभिजीत दीपक जोशी | एनआयएसएम | एनएसडीएल | लेखनिक | जानेवारी २०१९ |
| श्री. गौरव उदय रास्ते | एनआयएसएम | भवानी पेठ | लेखनिक | फेब्रुवारी २०१९ |
| श्री. निलेंद्र चंद्रशेखर अभ्यंकर | एनआयएसएम | हिशोब | लेखनिक | ऑक्टोबर २०१८ |

**वाचकांना नम्र आवाहन :** शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग इ. विषयी असणारी उपयुक्त बातमी, विशेष उपलब्धी, माहिती, गौरव, पुरस्कार किंवा लेख संबंधित छायाचित्रांसह जरूर पाठवावेत. यासाठीचा मजकूर A4 साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून बंद पाकिटातून पुढील पत्त्यावर पाठवावा. यामधील वेचक वेधक मजकूर गरुड झेप मध्ये प्रकाशित केला जाईल. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१**
**गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✲ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क साधावा.
**दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८.**

२९/०४/२०१९